# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांक : - २/एनजीसी/रॅगिंग-परिपत्रक/२०१५/८२०
दिनांक :- 23 APR 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- रॅगिंग प्रतिबंध ॲक्टबाबत......

शासन पत्र क्रमांक संकीर्ण –(१०९८/११३/९८) विशी-३, दि. २७ मे १९९९ अन्वये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ दि. ०१ जून १९९९ पासून अंमलात आलेला आहे.

सदर अधिनियमाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागातील एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी तसेच अभियांत्रिकी /तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲंड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी/ पदविका आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविण्या-या सर्व शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ व्यवस्थापनाअंतर्गत, विद्यापीठ विभाग तसेच विनाअनुदानित संस्थांच्या प्राचार्यांना रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ च्या ठळक प्रती संस्थेच्या आवारात, वर्गामध्ये, कॅंटीन आणि वसतीगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करण्याबाबत तसेच प्रथम वर्ष विद्यार्थ्यांची व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया बैठका आयोजित करुन त्यांना अधिनियमासंबंधी सूचना देण्यात याव्यात. रॅगिंग प्रकरण संस्थेत घडणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. जर रॅगिंग प्रकरण घडल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल.

रॅगिंग प्रकरण घडू नये म्हणून खालील सूचनांचे पालन करण्याबाबत संस्थाच्या प्राचार्यांना/संचालकांना कळविण्यात यावे.

१. प्राचार्य, उपप्राचार्य, रेक्टर यांची निवासस्थाने कॉलेज व हॉस्टेल कॅम्पसमध्ये असावीत.
२. त्यांनी दररोज आकस्मिक भेटी, विशेषतः हॉस्टेलना रात्रीच्या वेळी भेटी देण्यात याव्यात.
३. संस्थेच्या माहिती पुस्तिकेत याचे स्पष्टीकरण असावे व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थी व पालकांकडुन संबधित विद्यार्थी रॅगिंगपासून दूर राहिल असे प्रतिज्ञापत्र भरुन घ्यावे.
४. वर्षातून एकदा, संस्थास्तरावर पालकांचे मेळावे वर्षभरात एक दोन वेळा आयोजित करावेत व संस्थेची शिस्त आणि विद्यार्थ्यांचे वर्तन या बाबींची त्यातुन माहिती दयावी.
५. विद्यार्थी परिषदांनी आपल्या कार्यक्रमातून रॅगिंग विरुध्द आवाज उठवावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

क्रमांक-विकाअ/शिक्षण/रॅगिंग/२०१५/ १०५८
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक ०८/५/२०१५

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र / एम.बी.ए. / एम.सी.ए. - पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.